# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यानगर, कोल्हापूर 416004
दूरध्वनी क्र.0231 2521038
Email- gpkolhapur@yahoo.com

================================================================================

जा.क्र.शातंको/विवि/२०२१-२२/ 565 दिनांक :- 15 FEB 2022

**विदयार्थ्याकरीता सुचना :- क्रमांक ३**

संदर्भ :- १) या कार्यालयाचे परिपत्र क्रमांक शातंनिको/विवि / २०२१ – २०२२/ स्कॉलरशिप / ईबीसी/ ४३६२, दिनांक १६/१२/२०२१
२) मा. सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कोल्हापूर यांचे पत्र क्र सओसकक्को/मासि/ डीबीटी/२०२१-२२/४९६९,दिनांक २९/१२/२०२१
३) मा. सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कोल्हापूर यांचे पत्र क्र सओसकक्को/ भा.डॉ.बा.आं.स्वा.योजना/२०२०-२१/११४, दिनांक ०६/०१/२०२२
४) या कार्यालयाची सूचना क्रमांक २ शातंको/विवि / २०२१ – २०/७३०,दिनांक २७/०१/२२

शैक्षणिक वर्ष २०२१ – २२ मध्ये या संस्थेत शिकत असलेल्या प्रथम, व्दितीय, व तृतीय वर्षातील सर्व शाखेतील विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, एससी/एसटी/ओबीसी/व्हीजेएनटी व एसबीसी या प्रवर्गातील विदयार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती आणि शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क या योजनेचा लाभ दिला जातो. सदर योजनेची अमंलबजावणी ऑनलाईन माध्यमातून महाडीबीटी या संकेतस्थळाव्दारे करण्यात येते. भारत सरकार शिष्यवृत्तीचा फॉर्म ऑनलाईन भरणेची अंतीम मुदत **दिनांक ३१/०१/२०२२** पर्यत होती . सदर कालाधील ज्या विदयार्थ्याची शिष्यवृत्तीचा फॉर्म ऑनलाईन भरलेला आहे त्यांनी रोजच्या रोज आपले शिष्यवृत्तीचे लॉगीन पहाणेचे आहे कारण समाजकल्याण विभागाकडून कांही आक्षेप लावून फॉर्म परत आल्यास त्याची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधित विदयार्थ्याची राहील याची नोंद घ्यावी.

तसेच शासनाच्या धोरणानुसार मागासवर्गीय विदयार्थी शिष्यवृत्ती मिळण्यापासून वंचित राहू नये म्हणून शिष्यवृत्तीचा फॉर्म ऑनलाईन भरणेची अंतीम मुदत **दिनांक १५/०२/२०२२** पर्यत वाढविण्यात आली आहे त्यानंतर समाजकल्याण कोल्हापूर यांचेकडून महाडीबीटी लिक बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अदयाप ज्या विदयार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्तीचा फॉर्म ऑनलाईन भरला नाही त्यांनी त्वरीत शिष्यवृत्तीचा फॉर्म भरणेचा आहे. शिष्यवृत्तीचा फॉर्म भरणेसाठी कांही अडचणी येत असल्यास या संस्थेतील प्रतिनिधी श्री. पी एम शेडबाळे, वरिष्ठ लिपीक मो. न. ९६६५५५६६७० व श्री बी एस पाटील, वरिष्ठ लिपीक मो. न. ९४२११३३४८४ यांचेशी संपर्क साधावा.

तसेच अनुसूचित जाती तथा नवबौध्द घटकांतील इयत्ता ११ वी १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतर या संस्थेत प्रवेश घेतलेल्या दियार्थ्याना शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विदयार्थ्यांना स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी शासनाने सुरु केले आहे. कोरोना – १९ प्रादुभार्वामुळे सन २०२० – २०२१ व २०२१ – २०२२ या दोन वर्षाच्या शैक्षणिक कालावधीमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीता अर्ज सादर करण्याकरीता **दिनांक २८/०२/२०२२** पर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी अजुनही ज्या पात्र विदयार्थ्यांनी अर्ज सादर केले नाहीत त्यांनी त्वरीत अर्ज सादर करणेचे आहे.

( डॉ. डी. एम. गर्गे )
प्र. प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

प्रत :- १) मुख्य नोटीस बोर्डावर लावणेसाठी
२) विभाग प्रमुख स्थापत्य/यंत्र/विदयूत / माहिती तंत्रज्ञान / अणूविदयूत व दूरसंचार/ धातूशास्त्र यांना माहितीसाठी
२/- त्यांना कळविण्यात येते की, सदर नोटीस आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिव्याख्यात्यांच्या व्हॉटसअपवर पाठवून शिष्यवृत्तीचा फॉर्म भरणेबाबत वि दयार्थ्यांना सूचित करणेबाबत सूचना देण्यात याव्यात जेणेकरुन शिष्यवृत्ती योजनेच्या लाभांपासून पात्र असलेले विदयार्थी वंचित राहणार नाहीत.
३) श्री. इंगळे, प्रोग्रॅमर यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी ( परीक्षा नियंत्रक यांचेमार्फत )